**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## यु.जी.सी. सेमिस्टर आऊटरिच प्रोग्राम पायलट प्रोजेक्टच्या वर्कींग गृपवर कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांची निवड

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला बहुमान

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांची विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे उन्नत भारत अभियानांतर्गत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने सेमिस्टर आऊटरिच प्रोग्राम या पायलट प्रोजेक्टसाठी गठीत केलेल्या वर्कींग गृपवर सन्माननीय सदस्य म्हणून निवड झाली आहे. संपूर्ण भारतातून या समितीवर दहा ख्यातनाम व अभ्यासू मान्यवरांची निवड झाली असून त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर आहेत. देशभरामध्ये कुलगुरूंच्या रुपाने विद्यापीठाला मिळालेल्या बहुमानाबद्दल त्यांचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, प्राधिकारणींचे सन्माननीय सदस्य, विद्यापीठाचे विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अवर सचिव डॉ. रेणू बतरा ह्या या समितीच्या समन्वयक आहेत. उन्नत भारत अभियानामध्ये ग्रामीण भागाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. शासकीय प्रणालीसह शैक्षणिक संस्थांचे महत्वपूर्ण योगदान ग्रामविकासासाठी असावे, त्यातल्यात्यात विद्यार्थ्यांचा फोकस त्यावर रहावा, विद्यार्थ्यांना समाजाचे प्रश्न माहित व्हावे, त्यावर संशोधन व्हावे, यादृष्टीने हा प्रकल्प खूप महत्वाचा आहे. या माध्यमातून विद्यार्थी प्रत्यक्षरित्या समाजाशी जुळल्या जातील. शिक्षणाचा खऱ्याअर्थाने उपयोग समाजाच्या विकासासाठी झाला पाहिजे, या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांच्या कौशल्याला या माध्यमातून दिशा मिळण्यास हातभार लागणार आहे.

सेमिस्टर आऊटरिच प्रोग्राम (एस.ओ.पी.) पायलट प्रोजेक्ट अंतर्गत वर्कींग गृपच्या माध्यमातून शिक्षण व समाज या दोन्ही घटकांनी एकत्रित काम करुन शिक्षणाचा समाजाला उपयोग होईल, यासाठी पाऊले उचलण्यासाठी दिशा मिळणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये सेमिस्टर पॅटर्न अंतर्गत एक सेमिस्टर उन्नत भारत अभियानांतर्गत ग्रामविकास, संशोधन व तदनुषंगीक इतर विषयांसाठी निश्चित करण्यात येणार असून वर्गखोल्यातील अभ्यासक्रमाच्या बाहेर जावून विद्यार्थ्यांची समाजाशी प्रत्यक्ष नाड जोडण्यास प्रत्यक्ष मदत होणार आहे.

उन्नत भारत अभियानाचे विभागीय केंद्र अमरावती विद्यापीठाला मंजुर झाले आहे. या केंद्राला विदर्भातील सर्व विद्यापीठे व महत्वपूर्ण अठरा संशोधन व शैक्षणिक संस्था जोडल्या गेल्या आहेत. विद्यापीठे व त्या संस्थांच्या माध्यमातून त्यांचेशी संलग्नित महाविद्यालये व तेथील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश असून पाचशेच्यावर गावे दत्तक घेण्यात आली आहेत. हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यामध्ये अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचा सिंहाचा वाटा आहे. विद्यापीठाला खऱ्याअर्थाने ते समाजाशी जोडत असून कुमारीमातेचा प्रश्न सर्वप्रथम त्यांनी उचलून धरला. आज झरीझामणी सारख्या भागामध्ये कुमारी मातेच्या सर्वांगीण विकासासाठी होत असलेले सामुहिक प्रयत्न समाजाच्यादृष्टीने भूषणावह आहे.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांची यु.जी.सी. सारख्या शिखर शैक्षणिक संस्थेच्या महत्वपूर्ण समितीवर निवड झाल्याबद्दल त्यांचेवर सार्वत्रिक अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १२/१२/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी